प्रा२०५ अ धि सू च ना

नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दि. ९/२/९०

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६

क्रमांक - टीपीएस- २०८९/२३७०/सीआर ३०५/युडी-१२

ज्याअर्थी मिरज शहराच्या वाढीव क्षेत्राची विकास योजना [यापुढे उक्त विकास योजना म्हणून संबोधलेली] शासनाने नगर विकास विभागाचे निर्णय क्रमांक-टीपीएस-२०८२/५५९४/युडी-७, दिनांक १४ मे १९८४ अन्वये मंजूर केली असून दिनांक २०-७-८४ पासून अंमलात आलेली आहे, त्यानुसार सर्व्हे क्रमांक ८४/१ ही जमिन [यापुढे उक्त जमिन म्हणून संबोधलेली] शेती भूवापरासाठी विनिर्दिष्ट केलेली आहे ;

आणि ज्या अर्थी मिरज नगर परिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधि अधिनियम १९६६ [सन १९६६चा महाराष्ट्र अधिनियम ३७वा] [येथून पुढे उक्त अधिनियम म्हणून उल्लेखिलेला] च्या कलम-३७ मध्ये दिलेली वैधानिक पध्दती अनुसरुन उक्त विकास योजनेतील उक्त जमीन शेती भूवापरातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव [यापुढे उक्त फेरबदल म्हणून संबोधलेला] त्यांच्या दिनांक ९-६-८९ च्या पत्रान्वये महाराष्ट्र शासनास अंतिम मंजूरीसाठी सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने या प्रकरणी आवश्यक ती चौकशी केल्या नंतर आणि संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याशी विचार विनिमय केल्यानंतर उक्त विकास योजनेस उक्त फेरबदल प्रस्ताव योग्य असल्याने नियोजनाच्या दृष्टीने मंजूर करणे आवश्यक आहे असे ठरविले आहे;

त्याअर्थी आता उक्त अधिनियमाचे कलम-३७[२] अनुसार व प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त विकास योजनेतील उक्त फेरबदल प्रस्ताव मंजूर करीत आहे व त्यासाठी शासनाच्या उक्त विकास योजना मंजूरीच्या दिनांक १४ मे १९८४ च्या अधिसूचनेमध्ये पुढे दिल्या प्रमाणे दुरुस्ती करीत आहे.

उक्त विकास योजनेस अंतिम मंजूरी देण्याच्या उपरोक्त अधिसूचनेसोबत असलेल्या फेरबदल अनुसूचित शेवटच्या सुधारणेनंतर खालील प्रमाणे नवीन फेरबदलाचा समावेश करण्यात येत आहे;

" मिरज येथील स.नं.८४/१ ही जमिन शेती विभागातून वगळून रहिवास विभागात [भाग नकाशावर नारंगी रंगाने दर्शविल्याप्रमाणे] समाविष्ट करण्यात येत आहे."

टीप : उपरोक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा मिरज नगर परिषद आणि सहायक संचालक, नगर रचना, सांगली यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये सर्व नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला आहे.

सही/-

मुंबई ४०० ०३२ — कक्ष अधिकारी,

दिनांक — नगर विकास विभाग.

नक्कल/-

Draft **NOTIFICATION**

Urban Development Department,
Mantralaya, Bombay 400 032.
Dated - 9/2/1990.

Maharashtra Regional & Town Planning Act 1966

No.TPS- 2089/2370/CR.305/UD-13.

Whereas, the Development Plan of Miraj(Additional Area)(herein after referred to as the said Development Plan) has been sanctioned by the Government in Urban Development Department vide resolution No.TPS-2082/5594/UD-7,dt.14May 84 and the same has came into force with effect from 20-7-1984 according to which the land comprising of Survey No.84/1 (hereinafter referred to as the said land)has been included in Agricultural zone;

And whereas, the Miraj Municipal Council, in pursuance of the provisions of section-37 of the Maharashtra Regional & Town Planning Act 1966 (Mah.XXXVII of 1966)(here in after referred to as "the said act") after following all the legal procedure as stipulated under the act, has now vide its letter dated 9-6-89 submitted to the Government of Maharashtra a proposal of minor modification to the said Development Plan regarding change of zone of the said land from Agricultural a zone to Residential zone (hereinafter referred to as the said modification);

And whereas, the Government of Maharashtra after making due enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is satisfied that the said proposal of minor modification is necessary in the Planning & public interest and should be sanctioned.

Now, therefore, in exercise of the powers conferred under section 37(2) of the said act, the Government of Maharashtra hereby sanctions the said proposal of minor modification to the said Development Plan and for that purpose amends the Government in Urban Development Department resolution No.TPS-2082/5594/UD-7, dt.14 May 1984 as follows;

After the last entry in the schedule of modifications appended to the aforesaid notification, the following new

entry shall be inserted, viz;

" The piece of land bearing survey no.84/1 of Miraj is excluded from Agricultural zone and included in Residential zone as shown in ~~axgx~~ orange verge on the part plan."

Note : The aforesaid part plan showing the modification as sanctioned above is kept open for inspection ~~by~~ by the public during office hours on all working days in the office of the Miraj Municipal Council and the Asstt.Director of Town Planning,Sangli.

Sd/—


Bombay - 400 032 Dy.Secretary to Government.

date.

Sanctioned under Government Notif...
Urban Development
ment. No. TPS2089/2370/UD-30 ... Dated ...

## TOWN PLANNING AND VALUATION DEPARTMENT
(Sangli Branch)

Part Plan of sanctioned Development Plan of Miraj (Addl. area) showing the S.No.84 and its surroundings.




(B. M. AMBHAIKAR)
Joint Secretary,
Urban Development Department
Mantralaya, Bombay 400 032

Deputy Director of
Town Planning, Poona Division,
POONA.

SCALE:-1:

NOTES:-

1) Agricultural user washed in ... HOOKER'S GREEN
2) Proposed Roads shown in ... RED LINES
3) Municipal limit shown in ... ORANGE VERGE
4) Green belt washed in ... LEAF GREEN
5) Nalla washed in ... BLUE
6) S.No.84/1 ~~to be~~ included in the Residential zone shown in ... VERGED ~~PINK~~ ORANGE